# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर

डॉ. टि. एच. राठोड
मुख्य बिजोत्पादन अधिकारी
म.प्रा.प्र. वणी रंभापुर – ४४४१०२
ता. जि. अकाला (महाराष्ट्र)

कार्यालय दूरध्वनी: ०७२४ – २२३८१२७
ई – मेल:cspocdfwr@gmail.com
फॅक्स: ०७२४ – २२३८१२७

जा.क्र./म.प्रा.प्र./तां/1275/२०२४ दि. 30/०८/२०२४

### निविदा सुचना

सन २०२४–२५ हंगाम मध्ये बिजोत्पादन क्षेत्रामध्ये पिकांना सिंचन करण्यासाठी प्रति हेक्टर बाबनिहाय कामे

| अ.क्र. | करावयाचे काम | तपशिल | प्रति हेक्टर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पिकाला पाणी देणे (सिंचन करणे) | दांडाने पाणी देणे | |
| | | स्प्रिंकलर पध्दत (कार्यालयाचे) | |
| | | डिझेल इंजिन, ३० पाईप, ८ नोझल (स्प्रिंकलर संच) व मजुरासह | |

**<u>अटी व शर्ती</u>**

१. निविदा पत्रक /कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ६.०० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन **मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर** या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी
३. कंत्राटदाराकडे कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने संस्थेचे नोदणी प्रमाणपत्र, संस्थेचे प्रमाणपत्र विमा संरक्षण,भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र GST व संबधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे निविदा दर पत्रकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.
४. निविदा/कोटेशनमधील कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील.
५. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन क्षेत्रातिल सिंचनाची कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
६. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन क्षेत्रातिल सिंचनाची कामे करीत असतांना पिकांचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधित कंत्राट दाराकडून वसूल करण्यात येईल.
७. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन क्षेत्रातिल सिंचनाची कामे पूर्ण करण्यात यावी कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमांचे पालन करणे संबधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.
८. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी. अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.
९. कंत्राटदारास बिजोत्पादन क्षेत्रात सिंचनाची कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. संबधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्म जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
१०. कंत्राटदारास बिजोत्पादन क्षेत्रातिल सिंचनाची कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.
११. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन क्षेत्रातिल सिंचनाची कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) यांना कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण,भविष्य निर्वाह निधी देणे, तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादींची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
१२. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन क्षेत्रात सिंचनाची कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. संशोधन संचालक डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला यांचा राहील आणि तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.
१३. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन क्षेत्रात सिंचनाची कामे खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामा करिता असून सदर ६ महिन्याकरिता वैध राहतील

१४. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत विभागावर बिजोत्पादन क्षेत्रातील सिंचनाची कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी आसवे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ठ्या सक्षम असावेत.

१५. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर कार्यालया अंतर्गत विभागावर बिजोत्पादन क्षेत्रातील सिंचनाची कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

१६. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु ५०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१७. वरीलप्रमाणे अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविधा धारकांनी निविदा तपशिला नुसार दिनांक ११/३/२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावे.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
म.प्रा.प्र. वणी रंभापूर